ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 10 | JUNE - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# केंब्रीजपंथी इतिहासकार अनिल सिलच्या विचारांची इतिहासशास्त्रीय व वास्तववादी मिमांसा



**डॉ. विजय पुंडलिक साळुंखे**
**सहाय्यक प्राध्यापक ,**
**प्रताप महाविद्यालय, अमळनेर .**

केंब्रीजपंथी इतिहासकार म्हणुन प्रसिध्दीस आलेल्या आनिल सिल यांनी भारताच्या इतिहासावर प्रामुख्याने स्वत:च्या लेखनीने केवळ एक ग्रंथ लिहला. त्यामध्ये त्यांनी भारताच्या इतिहासाचे विशेषत: आधुनिक भारताच्या इतिहासाच्या विविध पैलुवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये पहिला ग्रथ त्यांनी जॉन गॅलाघर आणि गॉर्डन जॉन्सन सोबत लिहला. मात्र त्यांच्या या ग्रंथातून त्यांची वैचारीक बैठक दृष्टीक्षेपात येते. जॉन गॅलाघर गॉर्डन जॉन्सन आणि अनिल सिल यांनी एकत्रितपणे लिहलेल्या "*लोकेलिटी: प्रोव्हिन्स अॅन्ड नेशन एसेज इन इंडीयन पॉलिटीक्स* " या ग्रंथात त्यांचे वैचारीक अधिष्ठान आपणास जास्त जाणवते. हा ग्रंथ केंबीज युनिव्हसिटी प्रेसने १९७३ मध्ये प्रकाशित केला. या ग्रंथातून जरी केंबीजपंथी इतिहासलेखनाचे वैचारीक अधिष्ठान दिसून येत असले तरी, या इतिहासकारांवर व्हिग परंपरांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. आणि याच परंपरांचा प्रभाव अनिल सिलच्या लिखाणातही दिसून येतो. सिलचा दुसरा ग्रंथ म्हणजे "*द इमरजन्स ऑफ इंडीयन नॅशनालिझम कंपेटीशन अॅन्ड कोलाब्रेशन इन द लेटर नायंटीन्थ सेंच्युरी*" यामध्ये सुध्दा व्हिग परंपरांचा प्रभाव दिसून येतो. कारण इ. स. १६८८ च्या वैभवशाली राज्यक्रांतीपूर्वी ब्रिटनमध्ये व्हिग आणि टोरी या पक्षांचा उदय झाला. राज्यक्रांतीपूर्वी संसदेत जेव्हा एक 'बहिस्कार बिल' ठेवण्यात आले. या बिलाचा उद्देश जेम्स द्वितीय ऐवजी ड्युक ऑफ मन्मथ यांच्याकडे राजमुकुट सुपूर्त करणे हा होता मात्र इंग्लडचा राजा चार्लस द्वितीय याने आपल्या दुरदर्शी राजकिय धोरणांनी ब्रिटीश संसदेचे हे प्रयत्न हाणून पाडले. संसदेने मांडलेले हे बिल जरी पारीत होवू शकले नाही तरी या बिलामुळे ब्रिटीश संसदेत दोन पक्ष समोर आले. यात जेम्स द्वितीय याला राजपदावर बसविण्यासाठी विरोध करणारा गट गट Petitioner पिटीशनर म्हटला गेला. तर दुसरा गट Abhorer तिरस्कार करणारा म्हटला गेला. हा गट वरील प्रस्तावाचा विरोधी होता आणि चार्ल्स दुसराने आपला वारसदार नेमावा या धोरणाचे समर्थन करणारा होता. या शिवाय संसदेने चार्लस दुसऱ्याच्या विरोधातून बोलावलेल्या संसदेचा या गटाने

विरोध केला. त्यातूनच व्हिग परंपरांचा आपणास उदय झालेला दिसून येतो यामध्ये जेम्स मिल सारखे भारत द्वेषी सुध्दा याच विचारांचे समर्थक होते आणि मेकॉलेनेही याच विचारांची कास धरली त्यामुळे या इतिहासलेखनात भारताबद्दल पुर्वग्रह असणे स्वाभाविकच होते आणि त्या नंतरच्या पिढ्यांवर याच विचारांचा प्रभाव पडलेला होता. म्हणुन अनिल सिलच्या विचारांचा अभ्यास करणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे. तथापि केंब्रीज स्कूलचे इतिहासकार या जाणिवेकडे सोईस्कर दुर्लक्ष करतात की, व्हिगच्या विचारपरंपरेत काही मुलभूत दोष होते. प्रो एच. बटरफिल्डने आपला ग्रंथ The Whig Interpretation in History या ग्रंथामध्ये व्हिग दृष्टीकोनावर टिका केली आहे. व्हिग दृष्टीकोनाच्या विरोधात असलेल्या त्याच्या प्रमुख आरोपांमध्ये एक मुख्य आरोप असा होता की, व्हिग इतिहासकारांनी वर्तमानाचा संदर्भ देवून गतकाळाचा अभ्यास केला.[१] व्हिग दृष्टीकोनाविरुध्द असलेल्या त्यांच्या प्रमुख आरोपांमध्ये एक आरोप असा होता की, व्हिग इतिहासकारांनी वर्तमानाचा संदर्भ देवून गतकाळाचा अभ्यास केला. याचा मतितार्थ असा की, व्हिगचे इतिहासलेखन चुकीच्या सैध्दांतिक गृहितकांवर अवलंबून होते त्यामुळे केवळ पुर्वग्रहदुषीतच इतिहास लिहला गेला व दमनाच्या आणि शोषणाच्या नव्या तऱ्हाच या इतिहासकारांनी वापरलेल्या होत्या. याच इतिहासलेखनाला लोविस नेमियर यांनी वैचारीक अधिष्ठान पुरण्याचा प्रयत्न केला. त्यातून केंब्रीजमध्ये जॉन गॅलाघरच्या नेतृत्वात एक नवीन इतिहासकारांचा एक गट या नोमियरच्या विचारांची कास धरुन उभा राहीला. त्यांचेच प्रतिनिधीत्व पुढे अनिल सिल या इतिहाससंशोधकाने केलेले आपणास दिसून येते. या सर्वच केंबीजपंथी इतिहासकारांचा दृष्टीकोन डॉ, अरविंद गणाचारी म्हणतात त्या प्रमाणे, “परोपकारी सम्राज्यवाद आणि स्वहितैषी राष्टवाद असा होता.”[२] कारण या इतिहासकारांनी आणि सिलने इतिहासाचा अन्वयार्थ लावण्याकरीता केवळ भारतीयांना हिन दाखवता येईल असेच अभ्यासविषय निवडले. त्यामध्ये त्यांनी भारतीय राष्ट्रवादाच्या मुद्यावर विशेष भर दिलेला आपणास दिसून येतो. या संदर्भात भारतात राष्ट्रवाद निर्माण झालाच नाही असे विधान सिल करतात आणि त्यासंबंधी आपल्या विधानाची पुष्टी करतांना ते म्हणतात की, “कॉग्रेसचे नेते एका लहान शिक्षीत गटाचे सदस्य होते. आणि त्यांनी आपल्या खाजगी जीवनात पश्चिमेकडील भौतिक सुविधांचा अंगीकार केलेला होता आणि ते आपल्या जातीबांधवाच्या मागण्या सरकारडून मान्य करवून घेण्यातच धन्यता मानत होते.”[३] **सामान्यत: काँग्रेसचे नेते किंवा पुढारी हे शिक्षीत वर्गातील होते आणि ते उच्च वर्गाकडून आल्यामुळे काँग्रेसींना विरोध म्हणुनच रॉय यांनी हा तर्क वापरला, खरे तर समकालीन राजकारणाचा विचार करता काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी भारताच्या स्वातंत्र्याची मागणी जरी केली नसली तरी एकूणच लोकशाहीवादी सुधारणा शासनाने कराव्यात या मुद्यावर त्यांचा भर होता. किंबहुना सरकारनेही कायदे करतांना प्रारंभिक काँग्रेसच्या नेत्यांच्या या मागण्या मान्य केल्या. त्यामुळे संथ गतीने भारतात प्रातिनिधीक सरकारची स्थापना होण्यास मदत झाली. असे असले तरी केंब्रीजपंथी इतिहास अनिल सिल यांच्यावर व्हिग विचारांचा प्रभाव असल्याने सम्राज्यवादी विचारांच्या छत्राखाली त्यांचे पोषण झाल्यामुळे भारतीय राष्ट्रीय जाणिवांना दुय्यम मानण्याच्या त्यांच्या पध्दती या विचारातून प्रत्ययास येतात. कारण केंब्रीजपंथीयांचे इतिहासलेखन हे नवपरंपरावादी इतिहासलेखन होते. त्याने वसाहतवादाचा नवा ढाचा तयार करण्याची व्यवस्था तयार केली. त्यांनी**

**भारतीय राष्ट्रवादाचा विकास आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परीवर्तनांचेसुध्दा विश्लेषण केले.मात्र हे विश्लेषण चुकीच्या सैध्दांतिक गृहितकांवर आधारलेले होते कारण भारतीय राष्ट्रवादाची कुचंबना करण्यासाठी सिलने ब्रिटीस सम्राज्यवादाचे फायदेच आपल्या ग्रंथात नुमुद करण्यावर जास्त भर दिला. त्याचे म्हणणे होते की, "भारतावर राज्य केल्यामुळे ब्रिटनवर प्रशासकिय जबाबदाऱ्या, राजकिय अडचणी आणि परकिय युध्दांचे ओझे आले होते. व्यापाराच्या दृष्टीनेही भारताचा वाटा मोठा नव्हता मात्र त्याचा प्रभाव शेजारील देशांवर पडू लागला. भारताची दळणवळण व्यवस्था जागतिक बाजारपेठेशी जोडली गेली. आणि तीच्या आर्थिक व व्यापारी हालचालींना ब्रिटीश साम्राज्याचे पाठबळ मिळाले."[४] हे विचार सम्राज्यवादाचे हितसंबंध जोपासण्याचेच विचार होते. यातून भारतीयांना हिन किंवा दुय्यम लेखण्याची भावना आणि मानसिकता दिसून येते. खरे तर हा सम्राज्यवादी ब्रिटीश धोरणांचा परिपाक होता.**

**अनिल सिलचा दृष्टीकोन त्याच्या भारताच्या शिक्षणविषयक धोरणांच्या लिखाणातूनही स्पष्ट होतो. त्याने ब्रिटीशांनी सुरु केलेल्या शिक्षण धोरणांविषयक जे निष्कर्ष मांडले ते चुकीच्या गृहितकांवर अधारलेले होते. कारण " ब्रिटिशांना त्यांच्या शाळा व महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या भारतीयांकडून अधिक सुशिक्षित स्वरूपाचे सहकार्य मिळण्याची अपेक्षा होती. त्यांच्यापूर्वी भारतात आलेल्या इतर परकीय सत्तांप्रमाणेच ब्रिटिशांनाही प्रशासन चालविण्यासाठी मोठ्या संख्येने भारतीय नोकरशहा व अधिकारी आवश्यक होते. भारतातील प्रशासनासाठी नेहमीच अशा प्रकारच्या कौशल्यांची गरज भासत असे, जी केवळ पारंपरिक धार्मिक शिक्षणातून प्राप्त होऊ शकत नव्हती. त्यामुळे प्रत्येक पिढीत आणि प्रत्येक साम्राज्याच्या काळात प्रशासनात नैसर्गिकरीत्या भरती होणाऱ्या विद्वान हिंदू जातींनी त्या त्या सत्तेला आवश्यक असलेल्या लौकिक (सेक्युलर) शिक्षणाचा स्वीकार केला."[५] मात्र सिल हे या बाबीकडे सोईस्कर दुर्लक्ष करतात की, या शिक्षणामुळेच पाश्चात्य ज्ञान, विज्ञान, विचार भारतीयांपर्यंत पोहचण्यास मदत झाली. आणि त्यातून पाश्चात्य देशातील विवेकवाद, बुध्दीवाद या संकल्पना भारतीयांमध्ये रुजल्या. या शिवाय लोकशाही मुल्यांचे बिजारोपनही याच शिक्षणाने केले. परिणामी. त्यातून राष्ट्रभावना निर्माण होण्यास मदत झाली. असे असले तरी मुस्लिम शिक्षीतांच्या बाबतीत त्यांनी केलेली विधाने सुध्दा लक्षात घेण्यासारखी आहेत. ते म्हणतात, "एकोणिसाव्या शतकात कालपर्यंत फारसी भाषेचे विद्वान असलेले अनेक भारतीय इंग्रजी शिक्षणाचे उत्साही समर्थक बनले. सुरुवातीला ही प्रक्रिया प्रेसिडेन्सी शहरांमध्ये सुरू झाली आणि नंतर देशाच्या इतर भागांतही पसरली. हा उत्साह अनुभववाद** (Empiricism) **किंवा आगमन पद्धती** (Induction) **यांसारख्या पाश्चात्त्य बौद्धिक संकल्पनांबद्दलच्या आकर्षणामुळे नव्हता; तर नवीन सत्ताधाऱ्यांची भाषा व पद्धती शिकल्यास त्यातून मिळणाऱ्या नोकरी, पद आणि आर्थिक लाभांच्या अपेक्षेमुळे होता."[६]तथापी सत्ताधाऱ्यांची भाषा शिकल्यामुळे भारतीयांना एकत्र येण्याचे भाषा हे माध्यम बनले त्यातूनच विविध संघटनांचे एकीकरण होवून राष्ट्रीय काँग्रेस निर्माण झाली आणि याच काँग्रेसने भारतीयांच्या राष्ट्रीय जाणीवांना प्रभावित करण्याचे कार्य केले होते.**

**इंग्रजी शिक्षणाने भारतीयांवर केलेल्या परिणामांची आणि प्रभावाची चर्चा रजत कांत रे यांनी 'अर्बन रुटस् ऑफ इंडीयन नॅशनालिझम' या ग्रंथात केलेली आहे. ते म्हणतात, "कलकत्ता येथे उपलब्ध असलेल्या शिक्षणाच्या आणि सरकारी नोकरीच्या संधींमुळे ग्रामीण भागातील प्रतिष्ठित कुटुंबांतील, परंतु अल्प उत्पन्नावर उदरनिर्वाह करणाऱ्या अनेक तरुणांना तेथे आकर्षित केले. सरकारी प्रशासनातील कनिष्ठ पदांवर जातीय वर्चस्वाचे एक प्रकारचे अधिपत्य होते; परंतु मॅट्रिक (माध्यमिक) परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या संधीमुळे मुस्लिम आणि कनिष्ठ जातीतील इच्छुक व्यक्तींनाही इंग्रजी शिक्षणाच्या बळावर समाजात प्रतिष्ठा प्राप्त करण्याचा मार्ग खुला झाला."[७] यातून आपणास सामाजिक प्रतिष्ठा मिळेल असा सुशिक्षीत भारतीयांचा कयास होता. कारण भारतात परंपरागत पध्दतीने जातीव्यवस्था होती. या जातीव्यवस्थेच्या परिणामांनी पोळलेल्या लोकांना आपली स्वत:ची आर्थिक स्थिती सुधारण्याकरीता इंग्रजी शिक्षण घेवून इंग्रजांची नोकरी करणे आवश्यक होते. परिणामी या वर्गाने शिक्षण घेतल्यामुळे त्यांच्यात आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविषयी जाणिव झाली. त्यातून हे वर्गही भारताच्या राष्ट्रीय लढयात शामिल झालेले आपणास दिसून येतात. कारण त्यातूनच प्रारंभिक काळातील संघटना उदयास आल्या होत्या.**

**अनिल सिलने राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेबाबत सुरक्षा झडप या सिध्दांताचा वापर केला आणि काँग्रेसच्या स्थापनेपासूनच इंग्लंडमध्ये योग्य आणि अनुकूल प्रतिमा निर्माण करण्याबाबत ती अत्यंत जागरूक होती. त्यामुळे** इंग्लंडमध्ये प्रचार करणे (Propaganda) हे तिचे पहिले महत्त्वाचे उद्दिष्ट होते.[८] आपल्या या मताच्या पुष्ठीकरीता त्याने काँग्रेसवर आणि काँग्रेसच्या पुढाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात टिकाटिपणी केली आहे. तो म्हणतो की याच उद्देशाने दादाभाई नौरोजी १८८६ मध्ये पुन्हा इंग्लंडला गेले आणि ब्रिटिश संसदेची (Parliament) निवडणूक लढविण्याची योजना आखली. इंग्लंडमध्ये ते काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी नव्हते काँग्रेसचे अनेक नेते विविध मार्गांनी पाश्चिमात्य देशांत जात असत आणि इंग्लंडमध्ये त्यांना सहानुभूती असलेले अनेक मित्र व समर्थक मिळत असत.[९] असे असले तरी सिल हे विसरले की, भारतीयांजवळ इंग्लडमध्ये राहून निवडणुक लढवण्यासाठी पैसा नव्हता. किंबहुना प्रचारकार्याकरीता कोणताही निधी नव्हता. परिणामी इंग्लडमधून दादाभाईंनी निधीची कमतरता असल्याचे व निधीसाठी बहेरामजी मलबारी यांना पत्र पाठल्याचे उल्लेख आहेत. तथापी मुंबई काँग्रेसच्या नेत्यांनी विशेषत: काशिनाथ त्र्यंबक तेलंग आणि फिरोजशहा मेहता यांनी या योजनेला कोणताही पाठींबा दिला नाही.

या शिवाय मुस्लिमांच्या बाबतीत लेखन करतांना हिंदूंनी मुसलमांनानां दडपून टाकल्यामुळे मुस्लिम नेते स्वतंत्र मतदार संघ आणि ब्रिटीश राजवट चिरकालीन रहावी या करीता प्रयत्न करीत होते. अशाच अशयाचे लिखाण करण्यात आणि सम्राज्यवादी विचारांना खतपाणी घालण्यात सिलने धन्यता मानली. या शिवाय "मालमत्ता, संपत्ती आणि शिक्षण या निकषांवर आधारित मताधिकारातून निवडल्या जाणाऱ्या स्थानिक मंडळे (Local Boards), नगरपालिका (Municipalities) आणि विधिमंडळ परिषदा (Legislative Councils) यांमध्ये मुस्लिमांना अत्यल्प प्रतिनिधित्व मिळेल आणि त्यांच्या मताला फारसे महत्त्व राहणार नाही, अशी त्यांची भीती होती. लॉर्ड रिपन यांच्या स्थानिक स्वराज्याच्या योजना (Local

Self-Government Schemes) या भीतीला अधिक बळ देणाऱ्या ठरल्या. त्यामुळे बंगाल विधिमंडळ परिषदेतील मुस्लिम प्रतिनिधी युसुफ अली यांनी आपल्या समाजासाठी स्वतंत्र प्रतिनिधित्वाची (Separate Representation) मागणी केली."[९] म्हणजे याचा अर्थ असा की, हिंदू मुसलमानांमध्ये दरी वाढवून त्यांच्यातील राष्ट्रभावनेला आवर घालण्याचे कार्य आणि जमातवादी विचारांचा प्रसाराचे कार्य सिलने आपल्या लेखनातून जगाला दिले. खरे तर हिंदू आणि मुसलमान यांच्यात एकतेचे प्रयत्न सुरु झाल्यानंतर अशा प्रकारची तथ्ये ठेवून लिखाण करणे म्हणजे सम्राज्यवादाला पोषक वातारण तयार करण्याचाच हा प्रकार होता. कारण इ. स. 1912 मध्ये लखनऊ मध्ये झालेल्या जाहीर सभेत मुसलमानांचा पुढारी असलेल्या मजरुल हकने अशी भावना व्यक्त केली की, "काँग्रेसला विरोध करणारा मुसलमान आता समाप्त होत चालला आहे आणि तो कदाचित पुरातन वस्तुसंग्रहालयात सापडेल."[१०] या वरुन असे दिसून येते की, मुसलमानांमध्येही राष्ट्रभावनेचे बिजारोपन होत होते. मात्र ब्रिटीशांच्या धोरणांमुळेच हिंदू आणि मुसलमानांमध्ये दुही वाढली आणि जमातवादाला खतपणी घालणारे इतिहासलेखन करण्यात सिलसारख्या नेमीयरवाद्यांनी महत्वाची भूमिका बजावली.

## संदर्भ:-


१) Butterfield Herbert, *The Whig Interpretation of History* G. Bell & Sons, 1931, P. 31.

२) इतिहास लेखन मिमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका, खंड १, लोकवाङमय गृह, मुंबई, पृ. 104.

३) राय सचिन, भारतीय राष्ट्रवाद एवं इतिहास लेंखन की प्रवृत्तिया, अनामिका पब्लिशर्स एंड डिस्ट्रीब्युटर्स, दिल्ली, 2013, पृ. 214.

४) Seal Anil, The Emegrence of Indian Nationalism: Competition and Collaboration in the leter Nineteenth Century, Cambridge University Press, New York, 1971, P. 1.

५) Ibid, P. 11.

६) Ibid, P. 11.

७) Ray Rajat, Urban Roots of Indian Nationalism, Vikas Publishing House, New Delhi, 1979, P. 8.

८) Seal Anil, Loc Cit, P. 282.

९) Ibid, P. 282.

१०) ग्रोवर बी. एल, आधुनिक भारताचा इतिहास, अनु. बेल्हेकर एन. के., एस चंद, दिल्ली, २०१२, पृ. ४५९.